प्रेस नोट                    दि. ०८/०८/२०२६

**महानगर गॅस मधुन बोलत असल्याचे भासवुन बील अपडेट करण्याच्या बहाण्याने एपीके फाईल पाठवुन सर्वसामान्य नागरीकांच्या लाखो रूपयांचा बेमालूमपणे अपहार करणारे सायबर गुन्हेगारांच्या टोळीतील भारतातील सक्रिय हस्तक दहिसर पोलीस ठाणे, मुंबई यांनी गजाआड केले बाबत..**

दि.०२/०८/२०२६ रोजी बोरिवली पुर्व, मुंबई येथे राहणारे फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन गु.र.क्र. ११५३/२०२६ कलम ३१८(४),३१९(२), ३३६(३),३३८, ३४०(२), ६१(२) भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस) २०२३ सह कलम ६६ (क), ६६ (ड) आयटी ॲक्ट अन्वये नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील फिर्यादी पुरुष, वय ६८ वर्षे, राहणार बोरिवली पुर्व, मुंबई यांना दिनांक २५/७/२०२६ रोजी १६:०० वाजता मोबाईल वरून अनोळखी इसम नामे विनय शर्मा यांनी महानगर गॅस लिमिटेड कंपनी मधून बोलत असल्याचे भासवून फिर्यादींचे गॅस कनेक्शन कट करण्याची त्यांना भिती दाखवून त्यांनतर त्यांनी ते फिर्यादींची याबाबत मदत करत असल्याचे सांगून बील अपडेट करण्याकरीता एक एपीके फाईल पाठवुन फिर्यादींचे मोबाईलचा त्यांचे संमतीशिवाय ताबा मिळवून फिर्यादींचे बॅंक खात्यांमधून एकूण ९,९८,३६७.00/- (एकुण नऊ लाख अठ्ठयाण्णव हजार तीनशे सदुसष्ठ ) रूपयांची आर्थिक फसवणूक केली.

१. सदर गुन्हयात पाहिजे आरोपीतांनी वेगवेगळया बॅकांची करंट बॅक खाती सर्रासपणे वापर केली असून फिर्यादी यांचे मोबाईल चा ताबा मिळवुन फिर्यादी यांच्या बॅक ऑफ महाराष्ट्र च्या खात्यामधुन दि.२५/०७/२०२६ रोजी ३,४९,८५६/- एवढी रक्कम आरोपी क्र.०१ याच्या कॅनरा बॅकेच्या खात्यामध्ये भरणा केले होते. तसेच आरोपी क्र. ०२ यांचे आय सी आय सी आय बॅकेच्या खात्यावर फिर्यादी यांची फसवणुक झालेली २,००,०००/- रूपये इतकी रक्कम भरणा केले होते.

सदर बेनिफिशरी बॅक खातेदाराचा दहिसर पोलीस ठाणे, उत्तर विभाग चे तपासी पथक पोनि. दहिफळे, सपोनि पाचांगणे व पथक यांनी तांत्रिक व प्रत्यक्ष तपासाव्दारे उपरोक्त बॅक खाती फसवणूकीची रक्कम स्विकारणारा भारतात सक्रिय असणारा मुख्य आरोपी व त्याचे साथीदार यांना मुंबई येथून अटक करण्यात पोलीसांनी यश मिळवले आहे.

**अटक आरोपी** - १. आर्यन राजेश गुप्ता, वय- २१ वर्ष पत्ता- जोगेश्वरी, मुंबई.
२.अंकित संजय तिवारी, वय- २४ वर्ष, वसई.

**अटक आरोपीचा गुन्हयातील सक्रिय सहभाग** - अटक आरोपी क्र ०१.आर्यन राजेश गुप्ता वय- २१ वर्षे याने स्वत:ची वैयक्तिक माहिती व्दारे तयार केलेल्या कॅनरा बॅक खात्यामध्ये दि.२५/०७/२०२६ रोजी ३,४९,८५६/- एवढी रक्कम भरणा केली आहे.
अटक आरोपी क्र.०२ अंकित संजय तिवारी, वय- २४ वर्ष, याने स्वत:ची वैयक्तिक माहिती व्दारे तयार केलेल्या आय सी आय सी आय बॅक या खात्यावर फिर्यादी यांची फसवणुक झालेली २,००,०००/- रूपये इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे.
त्यांनतर सदर आरोपीतांनी नमुद गुन्हयात सायबर गुन्हयातील फसवणुकीची रक्कम प्राप्त करून तिची विल्हेवाट लावली आहे.

तरी नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अश्या प्रकारे अनोळखी सोशल मिडीया धारक व्हॉटसअप व्दारे अथवा सोशल मिडीयाव्दारे संपर्क करून महानगर गॅस मधुन बोलत असल्याचे सांगुन गॅस कनेक्शन बंद करण्याची भिती घालुन केवायसी करण्याच्या बहाण्याने एपीके फाईल पाठवुन मोबाईलचा ताबा मिळवण्याचा प्रयत्न करु शकतात त्यामुळे अशा कोणत्याच भीतीला बळी न पडता कोणताही आर्थिक व्यवहार न करता त्वरीत सायबर हेल्पलाईन १९३० येथे अथवा cybercrime.gov.in, sancharsaathi.gov.in येथे संपर्क करून तक्रार नोंद करावी.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस उपआयुक्त, उत्तर विभाग ०३, मुंबई श्री. गजानन देशमाने, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त दहिसर विभाग मुंबई श्री.जयराज रणवरे, व.पो.नि. सर्जेराव पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. राजेंद्र दहिफळे, सपोनि संदिप पाचांगणे, पोउनि आकाश पाटील, पोउपनि श्रुती मालपोटे, पोह कल्पेश सुर्वे, पोशि श्रीकांत देशपांडे, पोशि नितीन चव्हाण, मपोशि सोनल मस्के यांनी पार पाडली आहे.

-----000-----